
**Our Lady of Grace Trust's**

# ST. GONSALO GARCIA COLLEGE OF ARTS AND COMMERCE, VASAI

# DEPARTMENT OF RURAL DEVELOPMENT

## EXPERIENTIAL LEARNING THROUGH FIELD VISITS







**FIELD VISIT TO KVK KOSBAD, DAHANU**









# VISIT TO ARNALA SHETKARI SAHAKARI SOCIETY LTD., VIRAR WEST










# FIELD VISIT TO PROGRESSIVE FARMERS AT ARNALA, VASAI

\



**BEE KEEPING TRAINING KVK KOSBAD DHANU BY PROF. UTTAM SAHANE**





**FIELD VISITS TO KVK KOSBAD, DAHANU**





**TALK ON E-PEEK PAHANI BY TAHSIL OFFICE, VASAI**





**COLLEGE CAMPUS PRACTICAL ON E-PEEK PAHANI**








# TRIBAL DAY CELEBRATION

# कृषी आणि संलग्न व्यवसायातील नाविन्यपूर्ण उपक्रमातून व्यवसायाच्या संधी - डॉ. विलास जाधव

जव्हार (अग्रलेख वृत्तसेवा) - वसई येथील संत गोन्सालो गार्सिया कला व वाणिज्य महाविद्याल्यातील ग्रामीण विकास पदवी आणि पदव्युत्तर विभागाने कृषी विज्ञान केंद्र कोसबाड हिल ता. डहाणू, जि. पालघर येथे प्रात्यशिक भेटीसाठी दोन दिवसांचे निवासी शिबिर आयोजित केले होते.



सदर भेटीमध्ये त्यांना डॉ. विलास जाधव, प्रमुख शास्त्रज्ञ यांनी कृषी विज्ञान केंद्र ह्यांनी कृषी आणि संलग्न व्यवसायातील नाविन्यपूर्ण उपक्रमातून आर्थिक प्रगती कशी साधू शकतो ह्याबद्दल मार्गदर्शन केले, त्याच बरोबर कृषी विज्ञान केंद्र स्थापनेमागील उद्देश, केंद्राचे विविध उपक्रम, केंद्राचे विस्तार कार्य, केंद्राचे शेतकरी प्रशिक्षण वर्ग व रोजगार निर्मितीचे उपक्रम, महिला बचत गटांचे ग्रामीण विकासातील योगदान, कुक्कुटपालन व्यवसायातील युवकांच्या सहभागाची गरज अशा विविध विषयांवर पी.पी.टी व प्रत्यक्ष भेटीद्वारे माहितीद्वारे मार्गदर्शन केले.

डॉ. भूवनेश बारी, ग्रामीण विकास विभाग प्रमुख, पी एल श्रॉफ महाविद्यालय, चिंचणी यांनी ग्रामीण विकासात प्रात्यक्षिकांचे महत्व आणि त्यातून उद्योग निर्मिती, जोड व्यवसायाचे महत्व, या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. अशोक भोईर, सहाय्यक प्राध्यापक ह्यांनी वनस्पतीच्या अभिवृद्धीचे विविध प्रकार, कलमांचे विविध प्रकाराबाबत प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थांना मार्गदर्शन केले. मनोज कामडी प्रविण प्रशिक्षक जव्हार ह्यांनी मुलांना पेसा आणि वन हक्क कायद्याचे अनुसूचित जमातीच्या विकासातील महत्व ह्याबाबत मुलांना मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. अरुण पां.माळी, ग्रामीण विकास विभाग प्रमुख संत गोंसलो गर्सिया महाविद्यालय, वसई यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे विद्यार्थ्यांना रेन वॉटर हार्वेस्टिंग, फलोत्पादन, रोपवाटिका, शेडनेट, पॉलि हाऊस, कलमाचे विविध प्रकार या संदर्भात प्रत्यक्ष कृतीद्वारे माहिती उपलब्ध करून दिली. सदर शिबिरात संत. गोन्सालो गर्सिया महाविद्यालयाच्या ग्रामीण विकास पदवी आणि पदव्युत्तर विभागाचे ५ २ सहभागी झाले होते. सदर शिबिर हे प्रा. सूचित म्हात्रे, प्रा डॉ.अरुण माळी व प्राचार्य डॉ. सोमनाथ विभुते यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले.

# कृषी आणि संलग्न व्यवसायातील नाविन्यपूर्ण उपक्रमातून व्यवसायाच्या संधी-डॉ. जाधव

पालघर : वसई येथील संत गोंन्सालो गार्सिया कला व वाणिज्य महाविद्याल्यातील ग्रामीण विकास पदवी आणि पदव्युत्तर विभागाने कृषी विज्ञान केंद्र कोसबाड हिल ता. डहाणू, जि. पालघर येथे प्रात्यशिक भेटीसाठी दोन दिवसांचे निवासी शिबीर आयोजित केले होते.



दोन दिवसीय शिबिरात सहभागी झालेले महाविद्यालयीन विद्यार्थी.

सदर भेटीमध्ये त्यांना डॉ. विलास जाधव, प्रमुख शास्त्रज्ञ यांनी कृषी विज्ञान केंद्र ह्यांनी कृषी आणि संलग्न व्यवसायातील नाविन्यपूर्ण उपक्रमातून आर्थिक प्रगती कशी साधू शकतो याबद्दल मार्गदर्शन केले, त्याच बरोबर कृषी विज्ञान केंद्र स्थापनेमागील उद्देश, केंद्राचे विविध उपक्रम, केंद्राचे विस्तार कार्य, केंद्राचे शेतकरी प्रशिक्षण वर्ग व रोजगार निर्मितीचे उपक्रम, महिला बचत गटांचे ग्रामीण विकासातील योगदान, कुक्कुटपालन व्यवसायातील युवकांच्या सहभागाची गरज अशा विविध विषयांवर पी.पी. टी व प्रत्यक्ष भेटीद्वारे माहितीद्वारे मार्गदर्शन केले.

डॉ. भूवनेश बारी, ग्रामीण विकास विभाग प्रमुख, पी एल श्रॉफ महाविद्यालय, चिंचणी यांनी ग्रामीण विकासात प्रात्यक्षिकांचे महत्व आणि त्यातून उद्योग निर्मिती, जोड व्यवसायाचे महत्व, या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. अशोक भोईर, सहाय्यक प्राध्यापक यांनी वनस्पतीच्या अभिवृद्धीचे विविध प्रकार, कलमांचे विविध प्रकाराबाबत प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थांना मार्गदर्शन केले. मनोज कामडी प्रविण प्रशिक्षक जव्हार यांनी मुलांना पेसा आणि वन हक्क कायद्याचे अनुसूचित जमातीच्या विकासातील महत्व याबाबत मुलांना मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ. अरुण पां. माळी, ग्रामीण विकास विभाग प्रमुख संत गोंसलो गर्सिया महाविद्यालय, वसई यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे विद्यार्थ्यांना रेन वॉटर हार्वेस्टिंग, फलोत्पादन, रोपवाटिका, शेडनेट, पॉलि हाऊस, कलमाचे विविध प्रकार या संदर्भात प्रत्यक्ष कृतीद्वारे माहिती उपलब्ध करून दिली.

सदर शिबिरात संत. गोंन्सालो गर्सिया महाविद्यालयाच्या ग्रामीण विकास पदवी आणि पदव्युत्तर विभागाचे ५२ सहभागी झाले होते.

सदर शिबीर हे प्रा. सूचित म्हात्रे, प्रा डॉ. अरुण माळी व प्राचार्य डॉ. सोमनाथ विभुते यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले.

शब्दांना सत्याची धार

प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

# कृषी आणि संलग्न व्यवसायातील उपक्रमातून व्यवसायाच्या संधी : डॉ. जाधव

◆ पालघर (प्रतिनिधी) :



कृषी विज्ञान केंद्रांचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. विलास जाधव यांनी कृषी आणि संलग्न व्यवसायातील नावीन्यपूर्ण उपक्रमातून व्यवसायाच्या संधी असल्याचे सांगत आर्थिक प्रगती कशी साधू शकतो, याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.

वसई येथील संत गोंन्सालो गार्सिया कला व वाणिज्य महाविद्याल्यातील ग्रामीण विकास पदवी आणि पदव्युत्तर विभागाने कृषी विज्ञान केंद्र कोसबाड हिल ता. डहाणू, जि. पालघर येथे प्रात्यक्षिक भेटीसाठी दोन दिवसांचे निवासी शिबीर आयोजित केले होते. त्यावेळी डॉ. जाधव बोलत होते.

डॉ. जाधव यांनी कृषी विज्ञान केंद्र स्थापनेमागील स्थापनेमागील उद्देश, केंद्राचे विविध उपक्रम, केंद्राचे विस्तार कार्य, केंद्राचे शेतकरी प्रशिक्षण वर्ग व रोजगार निर्मितीचे उपक्रम, महिला बचत गटांचे ग्रामीण विकासातील योगदान, कुक्कुटपालन व्यवसायातील युवकांच्या सहभागाची गरज अशा विविध विषयांवर पी. पी. टी व प्रत्यक्ष भेटीद्वारे माहितीद्वारे मार्गदर्शन केले.

पी. एल. श्रॉफ महाविद्यालयाचे ग्रामीण विकास विभाग प्रमुख, चिंचणी डॉ. भुवनेश बारी यांनी ग्रामीण विकासात प्रात्यक्षिकांचे महत्व आणि त्यातून उद्योग निर्मिती, जोड व्यवसायाचे महत्त्व, या विषयावर मार्गदर्शन केले. सहाय्यक प्राध्यापक अशोक भोईर यांनी वनस्पतीच्या अभिवृद्धीचे विविध प्रकार, कलमांचे विविध प्रकाराबाबत प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थांना मार्गदर्शन केले. मनोज कामडी, प्रवीण प्रशिक्षक जव्हार यांनी मुलांना पेसा आणि वन हक्क कायद्याचे अनुसुचित जमातीच्या विकासातील महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. अरुण पां. माळी, ग्रामीण विकास विभाग प्रमुख संत गोंसलो गर्सिया महाविद्यालय, वसई यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेटीद्वारे विद्यार्थ्यांना रेन वॉटर हार्वेस्टिंग, फलोत्पादन, रोपवाटिका, शेडनेट, पॉलि हाऊस, कलमाचे विविध प्रकार या संदर्भात प्रत्यक्ष कृतीद्वारे माहिती उपलब्ध करून दिली.

सदर शिबिरात संत गोंन्सालो गर्सिया महाविद्यालयाच्या ग्रामीण विकास पदवी आणि पदव्युत्तर विभागाचे ५२ सहभागी झाले होते. प्रा. सुचित म्हात्रे, प्रा. डॉ. अरुण माळी व प्राचार्य डॉ. सोमनाथ विभुते यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर यशस्वीरीत्या पार पडले.

### पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा गृहपाठ बंद करण्याचा विचार

**पुणे** : पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा गृहपाठ बंद करण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. लवकरच तज्ज्ञांशी चर्चा करुन गृहपाठ बंदीवर निर्णय घेणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर म्हणाले, माझे वैयक्तिक मत आहे की, मुलांवर अभ्यासाचे ओझे देऊ नये. मुलांच्या मेंदूचा विकास झाला पाहिजे. तसेच गृहपाठ ही शिक्षकांसाठी पळवाट असता कामा नये. शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी कमी वेळात पटकन समजेल असे शिकवावे, जेणेकरून त्यांना गृहपाठाची गरज भासणार नाही. परंतु हा मोठा निर्णय असून हे माझ व्यक्तिगत मत आहे. याबद्दल शिक्षक संघटना, संस्था चालक त्यांच्याशी बोलणार आणि मग त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे.


दैनिक

# सागर

कोकणचे मुखपत्र

ठाणे, मुंबई, पालघर



दैनिक सागर

आमचे वितरक

दातार ॲण्ड सन्स

न्यूजपेपर्स डिस्ट्रिब्युटर्स प्रा.लि.

मुंबई ऑफिस : १४६ महेंद्र चेंबर्स, मॅगझिन मार्केट, न्यू इम्पायर सिनेमाजवळ, डी.एन. रोड, सीएसटी, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२-२२०३४३२७

ठाणे ऑफिस : फाटक वाडा, टेंभी नाका, ठाणे (प.) ४०० ६०१
फोन : २५३४ ४३ २७

7710095953 ▪ advertisement@dailysagar.in ▪ booking@dailysagar.in



शनिवार, १७ सप्टेंबर २०२२ | वर्ष : ५८ | अंक : ८८ | RNI Regi. No. MAHMAR/2016/68109 | संस्थापक संपादक - निशिकांत जोशी | रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर, मुंबई आवृत्त्या पाने : १० रुपये : ५.००


# ग्रामीण विकास विषयांच्या विद्यार्थ्यांनी घेतले 'इ-पीक ॲप'चे प्रशिक्षण

▶ **वसई** : संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालयाच्या ग्रामीण विकास विभाग आणि तहसीलदार कार्यालय वसई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ सप्टेंबर रोजी 'इ-पीक ॲप' प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रशिक्षण देण्यासाठी वसई तहसीलदार उज्वला भगत, निवासी तहसीलदार चंद्रकांत पवार, महसूल अधिकारी तथा मंडळ अधिकारी व तलाठी देखील उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमात 'इ-पीक ॲप'बद्दल सविस्तर माहिती देऊन विध्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये हे ॲप डाऊनलोड करण्यापासून ते त्याचा वापर आणि प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या शेतीवरीची माहिती मिळवून ती विविध १६ टप्प्यामध्ये कशी भरावयाची याबद्दल प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष वापर कसा करायचा ते ही विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणात ग्रामीण विकासाच्या विध्यार्थ्यानी सुरु केलेल्या सेंद्रिय शेती उपक्रमाच्या ठिकाणी या 'इ-पीक ॲप'चा प्रत्यक्ष वापर करताना कोणत्या अडचणी येतात व त्या कशा हाताळायच्या याविषयी मार्गदर्शन केले.



■ 'इ-पीक ॲप' प्रशिक्षण कार्यक्रमात विद्यार्थ्यांना माहिती देताना प्रशासकीय अधिकारी.

या कार्यक्रमासाठी सेंटजी जी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सोमनाथ विभुते यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानात प्रशासकीय कामकाजत विध्यार्थ्यांच्या सहभागाची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आयोजन डॉ. अरुण माळी यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक व ग्रामीण विकास विभागातील पदवी आणि पदव्युत्तर विभागातील साधारण १५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

मराठी दैनिक
# चौफेर संघर्ष
हेच जीवन

बुधवार १० ऑगस्ट २०२२ । अंक : २२७ | वर्ष : ०७ । पाने : ०८ । किंमत १ रुपया | E-mail : chaufersanghrsh15@gmail.com • kailas0007@gmail.com | RNI No.: MAHMAR/2015/66631



## संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालयात जागतिक आदिवासी गौरव दिन उत्साहात साजरा




वसई : संत गोन्सालो गार्सिया कॉलेज वसईतील ग्रामीण विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ.आशा चव्हाण जि. प.सदस्य, पालघर, सौ. अनिता जाधव पं. स. सदस्य, प्रमोद जाधव, बँक व्यवस्थापक, वसई विकास सहकारी बँक, आगाशी शाखा, सामाजिक कार्यकर्ते, विजय भुरे, शरद राणे,अभियंता मुंबई विद्यापीठ उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोमनाथ विभुते, उप-प्राचार्य प्रा.सरिथा कुरियन व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रामदास तोंडे यांची उपस्थिति होती. मान्यवरांच्या हस्ते दीप-प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामीण विकास विभाग प्रमुख डॉ. अरुण माळी यांनी केले. त्यांनी कार्यक्रमा विषयीची भूमिका विशद केली. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.विभुते म्हणाले की, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव धुमधडाक्यात सुरू आहे. अनेक उपक्रम देशभर राबवले जात आहेत.महात्मा गांधी म्हणाले होते, खेड्याकडे चला,आपण याउलट खेड्याकडून शहराकडे प्रवास सुरू केला. आपण गांधीजींचे ऐकले नाही. त्यामुळे आजचे अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. देशाच्या प्रगतीमध्ये सर्व जाती-जमातींचे योगदान आहे.आदिवासी बांधव मूळ निवासी आहेत. खरंतर ते या देशाचे मालक आहेत. त्यांना बरोबर घेऊन जर विकास आपल्याला साधता आला तरच आपण शाश्वत विकासाच्या दिशेने जाऊ. यासाठी रामायण, महाभारत आणि आधुनिक काळातील काही दाखलेही त्यांनी दिले. पुढे बोलताना ते म्हणाले की, मातृभूमीच्या संरक्षणासाठी आदिवासींनी फार मोठे योगदान दिलेले आहे. क्रांतिवीर बिरसा मुंडा यांचा उल्लेख करत त्यांनी राणी दुर्गावती यांच्या बलिदानावर प्रकाश टाकला. मोगलांविरुध्द झालेल्या युध्दात गोंड आदिवासी राणी दुर्गावतीचा अतुलनीय पराक्रम, शौर्य व स्वाभिमान सभागृहात त्यांनी जिवंत केला. अक्षरशः अंगावर शहारे उभे करणारा तो युद्धप्रसंग होता. ते बोलले की, आपला हा सर्व इतिहास आपण विसरत चाललो आहोत. इतिहास विसरू नका त्यातून प्रेरणा घ्या आणि पुढे जा. भविष्याची वाट वर्तमान काळातून चालत असताना भूतकाळातले बंध जे आहेत ते आपण तोडले तर आपला प्रवास अपूर्ण राहील हा सावधानतेचा इशाराही त्यांनी दिला. प्रमोद जाधव यांनी 'पेसा' कायद्याबद्दल माहिती दिली व सांगितले की, आदिवासी मुला-मुलींनी आपल्या अधिकारांविषयी जागरूक असले पाहिजे. आशा चव्हाण युवकांना संबोधित करताना म्हणाल्या, आदिवासी विद्यार्थ्यांनो उच्च शिक्षण घ्या, पुढे जा आणि तुमचे अस्तित्व घडवा. केवळ नोकरीच्या मागे न लागता व्यवसायातील संधी शोधा. कुणाली पांढरा, ज्योति व अंजली या विद्यार्थिनींनी आदिवासी समाज व संस्कृती विषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आदिवासी शेतकरी नृत्य व 'तारपा' नृत्य उत्तमरीत्या सादर केले. सूत्रसंचालन सोनल पावर हिने केले तर आभार डॉ.रामदास तोंडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विविध विभागाचे प्राध्यापक डॉ. नंदकुमार झांबरे, डॉ.अनिल सोनावणे, प्रा.जिमोल मॅथ्यू, डॉ.मोनिका पेनकर प्रा. सेबेस्टियन रिबेलो, प्रा. सुचित म्हात्रे, ग्रामीण विकास विभागाचे व एनएसएसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.











**FIELD VISIT TO PROGRESSIVE FARMERS IN DAHANU SOLAR WATER PUMP**


IN ASSOCIATION WITH
MACCIA
SUPPORTED BY
Fem@
MFGR. INDIA
अर्थसंकेत
महाराष्ट्र आर्थिक उन्नतीकडे
प्रस्तुत
-: थीम :-
अन्नदाता
सुखी भवं: !
PLATINUM SPONSOR
Sahyadri Farms
GOLD SPONSOR
एम्.के.घारे ज्वेलर्स






vivo Y20G
Feb 23, 2023, 09:01





# कॉलेजच्याच आवारात विद्यार्थ्यांनी फुलवला मळा

म. टा. वृत्तसेवा, वसई

शेतकऱ्यांनी शेतात, बांधावर भाजीपाला पिकवणे ही नेहमीची बाब. मात्र चक्क कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कॉलेजच्या आवारातच भाजीपाला पिकविल्याचे वसईत प्रथमच पाहायला मिळाले आहे. वसईतील संत गोन्सालो गार्सिया कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी हा प्रयोग केला असून त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ग्रामीण विकास विभागातील विद्यार्थ्यांना शेतीचे धडे देण्यात येतात. मात्र प्रात्यक्षिकाद्वारेच शेतीतील बाबी समजू शकतात. त्यामुळे संत गोन्सालो कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या आवारातील चार गुंठे जमिनीवर शेतीचा प्रयोग सुरू केला. केवळ प्रात्येक्षिकापुरते मर्यादीत न ठेवता, त्यापुढे जात विद्यार्थ्यांनी फावल्या वेळेत विविध फळझाडे, फुलझाडे आणि भाजीपाला यांची लागवड सुरू केली. केळीसह अन्य फळझाडे, फुलझाडे, मिरची, वांगी, कोथिंबीर यांसारखा भाजीपाला पिकवला आहे.

**जीजी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम**

“ सक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी प्रात्येक्षिकाद्वारे धडे देणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रयोग म्हणून शेती सुरू केली होती. मात्र विद्यार्थ्यांची आवड पाहता, त्यांनी पुढे जाऊन मोठ्या प्रमाणावर शेतीचे काम हाती घेतले आहे.

– अरुण माळी, विभागप्रमुख, ग्रामीण विकास विभाग

विद्यार्थ्यांचा शेतीचा प्रयोग हा कौतुकास्पद आहे. इतर विद्यार्थ्यांनीही याच प्रकारे कृती करण्याची गरज निर्माण झाली आहे.

– डॉ सोमनाथ विभुते, प्राचार्य, संत गोन्सालो गार्सिया कॉलेज

# Green Lab at College Campus